दैनिक
चला घडवुया सारे आदर्श
परिवर्तन
संपादक : विजयकुमार मोरे
RNI Regd No. MahMar/2019/80013

वर्ष १ ले | अंक २५ वा | दिनांक २५ सप्टेंबर २०१४ | किंमत ५ रु. | पाने ४ | पुणे
Volume 1 | Issue 25 | Date 25,September 2024 | Price 5 Rs. | Page 4 | Pune

अक्षय शिंदे एन्काउंटर प्रकरणी न्यायालयीन चौकशी होणार

आरोपीच्या वडीलांची न्यायालयात धाव!मृतदेह स्वीकारणार!



ठाणे : प्रतिनिधी

बदलापूर येथील एका भाजप पदाधिकाऱ्याच्या शाळेतील बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपी अक्षय शिंदे याचे पोलिसांकडून एन्काउंटर करण्यात आले होते. त्यानंतर त्याच्या या एन्काउंटरविषयी चर्चा सुरु झाली होती. आरोपीचे वडील न्यायालयात गेले होते. त्यानंतर आता या सर्व प्रकरणाची न्यायालयीन चौकशी केली जाणार असून सीआयडीमार्फत देखील चौकशी केली जाणार आहे. अशी माहिती ठाण्याचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली आहे. मात्र या प्रकरणी अधिक माहिती देण्यास त्यांनी नकार दिला.

बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काउंटर केल्यानंतर त्याच्या विरुध्द मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आली आहे. त्याला जेलमध्ये नेत असताना त्याने बेसावध असलेल्या पोलिसांच्या कमरेचे रिव्हॉल्वर हिसकावून घेऊन एका पोलिसावर गोळीबार केल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यात आला आहे. तसेच त्याचा आकस्मिक मृत्यू झाल्याचा गुन्हाही याच पोलिसात दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान अक्षय शिंदेचे वडील न्यायालयात गेले आहेत तर शासनानेदेखील या प्रकरणाची स्वतंत्रपणे सीआयडीमार्फत आणि स्वतंत्रपणे न्यायालयीन चौकशी केली जाणार आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. दरम्यान पोलिसांनी ज्या ठिकाणी गुन्हा घडला त्या ठिकाणचा पंचनामा केला असून एन्काउंटर झालेली पोलीस व्हॅन देखील ठाणे येथील मुख्यालयात दाखल केली असून तिचीही तपासणी केली असल्याचे पोलिस आयुक्तांनी पत्रकारांना सांगितले.

दरम्यान आरोपीचे वडील कोर्टात गेले असले तरी त्यांच्या कुटुंबियांनी अक्षयचा मृतदेह ताब्यात घेण्यास होकार दिला आहे. काल त्यांच्या कुटुंबियांनी आपण अक्षयचा मृतदेह ताब्यात घेणार नाही. जोपर्यंत या प्रकरणाची न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले जात नाहीत तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही असे म्हटले होते परंतु आज पोलीस आयुक्तानी स्वत: सांगितले की या संपुर्ण प्रकरणाची प्रकरणाची सीआयडी तसेच न्यायालयीन चौकशी होणार आहे.

त्यानंतर त्यांच्या कुटुंबियांनी आरोपीचा मृतदेह ताब्यात घेण्याचा निर्णय घेतला आहे. उद्या त्याच्या मगतदेहावर बदलापूर येथे अंत्यसंस्कार होणार आहेत.

१०वी पास उमेदवारांना पुण्यात नोकरीची संधी

पिंपरी: प्रतिनिधी

वीज महापारेषण पिंपरी चिंचवड पुणे अंतर्गत शिकाऊ उमेदवारांसाठी भरती सुरू आहे. शिकाऊ इलेक्ट्रीशियन पदांच्या एकूण २३ रिक्त जागा भरण्यासाठी पदांनुसार पात्र असणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. तुम्हाला या पदासाठी अर्ज करायचा असेल तर अर्ज कसा भरावा, अर्ज भरण्याची शेवटची तारीख, शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा इत्यादीविषयी सविस्तर करुन घेऊन अजृ करावा. पदाचे नाव – महापारेषण पिंपरी चिंचवड पुणे अंतर्गत शिकाऊ (इलेक्ट्रीशियन)उमेदवारांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. याचा पुणे परिसरातील बेरोजगार तरुणांनी फायदा घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

सोलापूर विमानसेवेचा उद्या पंतप्रधानांच्या हस्ते प्रारंभ

सोलापूर प्रतिनिधी

सोलापूरच्या बहुप्रतीक्षित नागरी विमानसेवेला मुहूर्त अखेर मिळाला असून येत्या २६ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुण्यात दूरदृश्य प्रणालीद्वारे सोलापूरच्या नागरी विमानसेवेचा शुभारंभ होणार आहे.

सोलापूरच्या बहुप्रतीक्षित नागरी विमानसेवेला मुहूर्त अखेर मिळाला असून येत्या २६ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुण्यात दूरदृश्य प्रणा-लीद्वारे सोलापूरच्या नागरी विमानसेवेचा शुभारंभ होणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर राज्यात विविध विकासकामांच्या शुभारंभासह भूमिपूजनांचा धूमधडाका सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून सोलापूर विमानसेवेचा शुभारंभ घा-ईगडबडीत उरकला जात आहे. केंद्र सरकारने यापूर्वी १५ जून २०१६ रोजी उडान योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यातच सोलापूर विमानसेवेला मंजुरी दिली होती. परंतु त्या अनुषंगाने सोलापूरच्या छोटेखानी विमानतळावर आवश्यक सुविधांचा अभाव असल्याने उडान योजना सोलापूरकरांसाठी कागदावर राहिली होती. त्यानंतर सुमारे सात वर्षे विमान सेवेबाबत फारशा हालचाली झाल्या नव्हत्या. अलीकडे दोन वर्षांत विमानसेवेची मागणी जोर धरू लागली. परंतु विमानसेवेसाठी विविध ३६ अडथळे असल्यामुळे हा प्रश्न रखडला होता, सर्व अडथळे पार करीत सेवा सुरु झाली आहे.

बदलापूर अत्याचार प्रकरणी अक्षय शिंदेच्या वडीलांची कोर्टात धाव

उल्हासनगर : प्रतिनिधी

बदलापूर येथील एका भाजपशी निगडीत शाळेत झालेल्या बाल लैगिक गुन्ह्यातील आरोपीचा काल पोलिसांनीच एन्काउंटर केल्यानंतर आरोपीचे त्तडीलांनी या एन्काउंटरच्या विरोधात आपण न्यायालयात दाद मागणार असल्याचे म्हटले आहे.

लैगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीला कारागृहात नेत असतानाच पोलियांनी खोटी चकमक घडवून अक्षय शिंदे याचा खून केला असल्याचा आरोप अक्षय शिंदेच्या वडीलांनी केला आहे. एकाद्या माणसाचे हात बांधलेले असताना तोंडावर कपडा झाकलेला असताना तो पोलिसांची बंदूक कशी काय हिसकावून घेऊ शकतो? तसेच बंदूक चालवू शकत नाही असे त्याच्या वडीलांचे म्हणणे आहे.

आज राज्यातील प्राथमिक शिक्षकाचे रजा आंदोलन

: राज्यातील सर्व प्राथमिक शिक्षकांचे आज रजा आंदोलन होत आहे. प्राथमिक शाळा बंद रहाणार आहेत. कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये शिक्षकांची कंत्राटी नियुक्ती, विद्यार्थ्यांना गणवेश न मिळणे, अध्यापन सोडून करावी लागणारी प्रशासकीय कामे अशा विविध मुद्द्यांवर राज्यभरातील शिक्षक आज (२५ सप्टेंबर) रजा घेऊन आंदोलन करणार आहेत. त्या अंतर्गत शिक्षक संघटनातर्फे राज्यभरातील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचे नियोजन करण्यात आले असून, त्यामुळे काही ठिकाणी शाळा बंद राहण्याची शक्यता आहे.

शालेय शिक्षण विभागाने घेतलेल्या विविध निर्णयांमुळे राज्यातील शालेय शिक्षणावर विपरित परिणाम होणार असल्याची शिक्षक संघटनांची भूमिका आहे. त्यामुळे शिक्षण विभागाच्या निर्णयांविरोधात प्राथमिक शिक्षकांची काही दिवसांपूर्वी पुण्यात बैठक झाली. त्यात शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांचा सहभाग असलेले व्हॉट्सअॅप समूह सोडणे, काळी फीत लावून काम करणे अशाप्रकारे विरोध दर्शवण्यात आला. त्यानंतर आता रजा घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला जाणार आहे.कमी पटाच्या शाळांवर तात्पुरत्या शिक्षकांची नियुक्ती, पुढे त्या शिक्षकालाही काढून टाकल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबणार आहे.

शाळा सुरू होऊन तीन महिन्यांनंतरही कित्येक विद्यार्थी गणवेशाविना आहेत. मिळालेले गणवेश विद्यार्थ्यांच्या मापाचे नाहीत, अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना बसायला बाके नाहीत, काही ठिकाणी पुस्तकेही पोहोचलेली नाहीत, शाळांच्या इमारतीची दुरवस्था आहे. शाळेत पोषण आहारात रोज वेगवेगळे पदार्थ द्यायला सांगून त्यासाठी आवश्यक अनुदान दिले जात नाही. शिक्षकांना शिकवायची इच्छा असताना कागदपत्रे तयार करणे, ऑनलाइन बैठका, सातत्याने माहिती पाठवणे, उपक्रम करण्यात वेळ जातो. त्यामुळे अध्यापनासाठी पुरेसा वेळ देता येत नाही.



बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेला अशा प्रकारे पकडून तोंडावर कपडा टाकून पोलीस कारागृहाकडे नेत असताना त्याने सोबतच्या पोलिसाकडचे रिव्हॉल्वर काढून गोळी झाडली असा आरोप त्याच्यावर करण्यात आला आहे. त्यांनतर दुसऱ्या संजय शिंदे नामक अधिकाऱ्याने आपल्या रिव्हॉल्वरमधून त्याच्या डोक्यात गोळ्या घालून एन्काउंटर करण्यात आले.

पुण्याचे एसपी पंकज देशमुख यांच्या बदलीस कॅटकडून स्थगिती

पुणे : प्रतिनधी

पुणे ग्रामिणचे जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांची मुदतपूर्व बदली मुबईमध्ये करणयात आली होती. परंतु ते नवीन ठिकाणी हजर न होता सरकारच्या या निर्णयाविरुध्द कंटमध्ये गेले होते. त्यावेळी कॅटने त्यांच्या बदलीस स्थगिती दिली आहे. त्यामुळे पंकज देशमुख आता पुणे ग्रामिणचे पोलीस अधीक्षक म्हणून कायम रहाणार आहेत.

विश्लेषा प्रिंटर्स अँड पब्लिशर्स यांच्या मालकीचे हे पत्रक, मुद्रक - प्रकाशक विजयकुमार रामचंद्र मोरे यांनी विश्लेषा प्रिंटर्स, गट नं. ४४५, शनिमंदिराजवळ कान्हे, ता. मावळ, जि. पुणे - ४१२१०६ येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक : विजयकुमार रामचंद्र मोरे संपर्क ७९७२८१६१८०.

This newspaper owned by Vishlesha printers and Publisher, printed and published by Vijaykumar Ramchandra More at Vishlesha Printers , Gut No.445, Near Shani Mandir, Kanhe, ta. Maval, Dist. Pune - 412106 Editor : Vijaykumar Ramchandra More Contact : 7972816180